| महाराष्ट्र पोलीस | पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण<br>पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003<br>दुरध्वनी नंबर 0253-2309700<br>E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|

**प्रेस नोट** दिनांक : १८/१०/२०२४

## महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने नाशिक ग्रामीण पोलीस दलाची अवैध व्यवसायांविरूध्द धडक कारवाई

---

दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासुन महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागु करण्यात आली असून त्या अनुशंगाने नाशिक परिक्षेत्राचे मा. विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. दत्तात्रय कराळे, पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून नाशिक ग्रामीण जिल्हयात खालीलप्रमाणे अवैध व्यवसायांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून ते आजपावेतो नाशिक ग्रामीण जिल्हयातील अतिदुर्गम डोंगराळ भागातील द-या-खो-यांमध्ये हातभट्टीची गावठी दारू तसेच अवैधरित्या मद्याची विक्री व वाहतूक करणा-या १३१ इसमांविरूध्द एकुण १३० केसेस दाखल करण्यात आल्या असून त्यामध्ये १२,१५,४०८/- रू. किं.चा. अवैध मद्यसाठा नाश करण्यात आलेला आहे.

अवैध गुटखा विरोधी केलेल्या कारवाईत वणी पोलीस ठाणे हद्दीत मा. विशेष पोलीस महानिरीक्षक नाशिक परिक्षेत्र नाशिक यांचे पथकाने अंकलेश्वर राज्य गुजरात येथून मालवाहू ट्रकमध्ये शेतीचे कॅरेटच्या मागे लपवून गुटख्याची अवैधरित्या तस्करी करणारे इसमांवर छापा टाकून कारवाई केली आहे. सदर छाप्यात २३,४०,०००/- रुपये किंमतीचा हिरा पानमसाला गुटखा व मालवाहू ट्रक असा एकुण ४३,६५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच मालेगाव शहरातील पवारवाडी पो. स्टे., ओझर पो.स्टे. आणि जिल्हयातील इतर पोलीस ठाणे हद्दीत गुटखा वाहतुकीसंदर्भात एकुण ०६ गुन्हे दाखल करण्यात आले असून ०७ आरोपींना अटक केली आहे. त्यात किं.रू. ५,४५,८६९/- चा अवैध गुटखा व वाहतुकीसाठी वापरलेली वाहने असे मिळुन ८,५३,८६९/- रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. अशाप्रकारे निवडणुक आचारसहिता लागु झाल्यापासुनच्या ३ दिवसात रुपये ६४,३४,२७७/-किमतीचा मुददेमाल जप्त/नाश करण्यात आलेला आहे.

आगामी विधानसभा निवडणुक २०२४ च्या पार्श्वभुमीवर अवैध व्यवसायांविरोधात जिल्हयातील पोलीस ठाणेनिहाय सत्वर कारवाई करण्यात येणार आहे.